पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
क्रॉफर्ड मार्केटजवळ, नवीन मंत्रालय इमारत, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

दिनांक : ५ नोव्हेंबर, २०२६

अधिसूचना

भारताचे संविधान

क्रमांक: आपना-०२२३/प्र.क्र.११०/पापु-१५:- भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि या संदर्भात यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा पत्रके ज्यांचा संबंध भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालयातील सह संचालक (अभियांत्रिकी), मुख्य खोदन अभियंता, वरिष्ठ खोदन अभियंता आणि उपअभियंता (यांत्रिकी) (गट-अ) या पदांशी आहे, अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालयातील सह संचालक (अभियांत्रिकी), मुख्य खोदन अभियंता, वरिष्ठ खोदन अभियंता आणि उपअभियंता (यां.) (गट-अ) या पदांच्या सेवा प्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याद्वारे पुढील नवीन नियम करीत आहेत:-

१ **संक्षिप्त नाव, प्रारंभ**

(१) या नियमांना "भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालयातील **सह संचालक (अभियांत्रिकी) ,मुख्य खोदन अभियंता, वरिष्ठ खोदन अभियंता आणि उपअभियंता (यांत्रिकी) गट-अ (राजपत्रित) (सेवाप्रवेश) नियम, २०२६"** असे संबोधण्यात यावे.

(२) सदर नियम महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२ **व्याख्या :-** या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,-

(क) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ,

i. सह संचालक (अभियांत्रिकी) आणि मुख्य खोदन अभियंता, गट-अ (राजपत्रित) या पदांवर उमेदवाराची नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री हे सक्षम प्राधिकारी असतील; आणि

ii. वरिष्ठ खोदन अभियंता आणि उप अभियंता (यांत्रिकी) गट-अ, (राजपत्रित) या पदांवर उमेदवाराची नियुक्ती करण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रभारी मंत्री हे सक्षम प्राधिकारी असतील.

(ख) आयोग " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे;

(ग) "पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग" याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग असा आहे;

(घ) "संचालनालय" याचा अर्थ महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालय असा आहे ;

(ड) "पदोन्नतीसाठीची पात्रता" याचा अर्थ, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी यासंदर्भात निर्गमित केलेले नियम, शासन निर्णय किंवा आदेशाव्दारे पदोन्नतीसाठी विहित केलेल्या अटी व शर्तीनुसारची पदोन्नतीसाठीची पात्रता असा आहे.

(च) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे;

(छ) "पदवी" याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता असा आहे.

(ज) "विभागीय परीक्षा" याचा अर्थ भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील अभियांत्रिकी संवर्गासाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या विभागीय परीक्षा नियमांनुसार घेण्यात येणारी परीक्षा होय.

३ **सहसंचालक (अभियांत्रिकी) गट-अ (राजपत्रित)** या पदावर मुख्य खोदन अभियंता गट-अ हे पद धारण करणा-या तसेच सदर पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या आणि पदोन्नतीसाठीच्या पात्रतेचे निकष पूर्ण करणा-या योग्य व्यक्तींमधून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल.

४ **मुख्य खोदन अभियंता गट-अ (राजपत्रित)** या पदावर वरिष्ठ खोदन अभियंता, गट-अ हे पद धारण करणा-या तसेच सदर पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या आणि पदोन्नतीसाठीच्या पात्रतेचे निकष पूर्ण करणा-या योग्य व्यक्तींमधून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल.

५ **वरिष्ठ खोदन अभियंता गट-अ (राजपत्रित)** या पदावर उप अभियंता (यांत्रिकी), गट-अ हे पद धारण करणा-या तसेच सदर पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या आणि पदोन्नतीसाठीच्या पात्रतेचे निकष पूर्ण करणा-या योग्य व्यक्तींमधून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल.

६ **उप अभियंता (यांत्रिकी) गट- अ या पदावरील नियुक्ती एकतर-**

(क) खालील पद धारण करणाऱ्या तसेच पदोन्नतीसाठीच्या पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या योग्य व्यक्तीमधून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने, -

१. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी), हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर दहा वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या आणि त्यापैकी किमान ५ वर्ष शाखा अभियंता गट-ब (राजपत्रित) या दर्जोन्नतीच्या पदावर सलग नियमित सेवा झालेल्या व्यक्तीमधून; किंवा

२. जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) गट क (अराजपत्रित) हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर दहा वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या आणि त्यापैकी किमान ५ वर्ष शाखा अभियंता गट-ब (राजपत्रित) या दर्जोन्नतीच्या पदावर सलग नियमित सेवा झालेल्या व्यक्तीमधून; किंवा

(ख) नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीचा मार्ग:-

आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या आणि खालील पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे करण्यात येईल.

(एक) वयोमर्यादा:-

(i) किमान वयोमर्यादा- जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी नाही.

(ii) कमाल वयोमर्यादा- जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अमागासवर्गीय व्यक्तींसाठी ३८ वर्षापेक्षा व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नाही.

(दोन) किमान शैक्षणिक अर्हता:-

यंत्र अभियांत्रिकी किंवा स्वयंचलीत अभियांत्रिकी शाखेतील किमान पदवी धारण करीत असलेली व्यक्ती.

७ **नियुक्ती प्राधिकाऱ्यांची मान्यता**- नियम ३ ते ६ येथील पदावर नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात येईल.

८ **नियुक्तीचे प्रमाण :-**

(क) नियम ६ येथे नमूद केलेल्या पदावरील पदोन्नती व नामनिर्देशनाने नियुक्तीचे प्रमाण अनुक्रमे ५० : ५० असे राहील.

(ख) नियम ६ मध्ये नमूद केलेल्या पदावर, संचालनालयातील शाखा अभियंता (यांत्रिकी) आणि जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील शाखा अभियंता (यांत्रिकी) यांच्यामधून पदोन्नतीने नियुक्तीचे प्रमाण अनुक्रमे २०:८० असे राहील.

९ **विभागीय परीक्षेची तरतूद :-**

(क) नियम ६ येथील नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांनी पदोन्नतीपूर्वी विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा विभागीय परीक्षेमधून सूट मिळणे आवश्यक आहे. जर अशी व्यक्ती विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाली नाही अथवा सूट मिळाली नाही तर ती व्यक्ती सदर पदावर पदोन्नतीसाठी पात्र राहणार नाही.

(ख) नियम ६ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीला, त्या पदासाठी विहित केलेली विभागीय परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक असेल; जर अशी व्यक्ती विहित कालावधीत ती विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाली नाही, तर तिची सेवा समाप्त केली जाईल.

१० **परिवीक्षाधीन कालावधी:-** नियम ६ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीकरिता परिवीक्षाधीन राहील. परिवीक्षा कालावधी कमाल एक वर्षापर्यंत वाढविता येईल. सदर परिवीक्षा कालावधीत (वाढीव कालावधीसह) विहित केलेली विभागीय परीक्षा (असल्यास) उत्तीर्ण होणे तसेच विहित प्रशिक्षण (असल्यास) पूर्ण करणे आणि शासनाच्या परिवीक्षा धोरणानुसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण

करणे आवश्यक राहील. शासनाच्या परिवीक्षा धोरणानुसार परिवीक्षा कालावधी (वाढवलेल्या कालावधीसह) समाधानकारकपणे पूर्ण न केल्यास, किंवा परिवीक्षा कालावधीत विहित विभागीय परीक्षा (असल्यास) उत्तीर्ण न झाल्यास, किंवा विहित प्रशिक्षण (असल्यास) पूर्ण न केल्यास, त्यांची सेवा समाप्त केली जाईल.

११ **हिंदी व मराठी भाषा परीक्षेबाबतची तरतूद :-**

(क) नियम ३, ४, ५ व ६ येथे नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त होणा-या व्यक्तीने, पदोन्नतीपूर्वी हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात मराठी भाषा विभागाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेली असणे अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील.

(ख) नियम ६ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणा-या व्यक्तीने, नियुक्तीपूर्वी हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात मराठी भाषा विभागाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेली नसेल अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली नसेल तर, नियुक्तीनंतर संबंधित नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही तसेच ती व्यक्ती वरिष्ठ पदावर पदोन्नतीस पात्र राहणार नाही.

१२ **संगणक अर्हता प्रमाणपत्राबाबतची तरतूद:-**

(क) नियम ३, ४, ५ आणि ६ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीकडे, शासनाने वेळोवेळी विहित केलेले नियम किंवा आदेश यांनुसार विहित केलेले संगणक अर्हता प्रमाणपत्र (Certificate of Computer Operations) असणे आवश्यक राहील; मात्र, संबंधित पदावर पदोन्नती मिळण्यापूर्वीच जर त्या व्यक्तीकडे असे प्रमाणपत्र असेल किंवा तिला त्यातून सूट मिळाली असेल, तर ही अट लागू होणार नाही.

(ख) नियम ६ येथे नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, शासनाने वेळोवेळी विहित केलेले नियम किंवा आदेश यांनुसार विहित केलेले संगणक अर्हता प्रमाणपत्र (Certificate of Computer Operations) धारण केलेले नसल्यास, विहित मुदतीत सदर प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत प्रमाणपत्र धारण न केल्यास, सदर संगणक प्रमाणपत्र धारण करेपर्यंत सदर व्यक्तीला वार्षिक वेतनवाढ आणि वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय असणार नाही.

१३ **लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाबाबतची तरतूद :-**

(क) नियम ६ येथील पदावर नामनिर्देशनाव्दारे नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतूदीनुसार व

त्याबाबत वेळोवेळी करण्यात येणा-या नियमांनुसार किंवा पत्रकानुसार, नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील.

(ख) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापनामध्ये जर अपत्यसंख्या दोन पेक्षा अधिक असल्याचे नमूद केल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित उमेदवार शासकीय नियुक्तीसाठी अपात्र राहील.

(ग) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर त्याला दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिध्द झाले, तर ती व्यक्ती शासन सेवेकरीता अनर्ह राहील.

१४ नियम ३ ते नियम ६ येथील पदांवर नियुक्त होणाऱ्या व्यक्तींची सेवाज्येष्ठता यादी ही राज्यस्तरावर ठेवण्यात येईल. त्यामुळे सदर व्यक्ती ही महाराष्ट्रात राज्यस्तरावर बदलीसाठी पात्र राहील.

१५ कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीपूर्वी किंवा नियुक्तीनंतर, शासनाने यासंदर्भात कोणत्याही नियमांन्वये, आदेशांन्वये किंवा निर्णयान्वये वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्ती संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(पराग जैन-नैनुटिया)
अपर मुख्य सचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

Water Supply and Sanitation Department

7th Floor, G.T. Hospital Bldg, Near Crawford Market, New Mantralaya Bldg, Lokmanya Tilak Marg, Mumbai 400 001.
Dated the 5th November, 2026.

NOTIFICATION

Constitution of India. No. AaPaNa-0223/C.R.110/WS-15.- In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all the existing rules, orders or instruments issued in this behalf so far as they are related to the posts of Joint Director (Mechanical), Chief Drilling Engineer, Senior Drilling Engineer and Deputy Engineer (Mechanical), Group-A (Gazetted) in the Directorate of Groundwater Surveys and Development Agency, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Joint Director (Mechanical), Chief Drilling Engineer, Senior Drilling Engineer and Deputy Engineer (Mechanical), Group-A *(Gazetted)* in the Directorate of Groundwater Surveys and Development Agency under the administrative control of the Water Supply and Sanitation Department of the Government of Maharashtra, namely:-

1. *Short title and commencement.*- *(1)* These rules may be called the Joint Director (Mechanical), Chief Drilling Engineer, Senior Drilling Engineer and Deputy Engineer (Mechanical), Group-A *(Gazetted)*, in the Directorate of Groundwater Surveys and Development Agency (Recruitment) Rules, 2026.

(2) These rules shall come into force on the date of publication of these rules in the *Maharashtra Government Gazette*.

2. *Definitions.*- In these rules unless the context requires otherwise,-

a. "Appointing Authority" means,-

(i) the Chief Minister, Maharashtra State, shall be competent authority to appoint candidates to the posts of Joint Director (Mechanical), and Chief Drilling Engineer, Group-A *(Gazetted)*; and

(ii) the Minister in-charge of the Water Supply and Sanitation Department shall be competent authority to appoint candidates to the posts of Senior Drilling Engineer, and Deputy Engineer (Mechanical), Group-A *(Gazetted)*;

b. "Commission" means the Maharashtra Public Service Commission;

c. "Department" means the Water Supply and Sanitation Department of the Government of Maharashtra;

d. "Directorate" means the Directorate of Groundwater Surveys and Development Agency under the administrative control of the Water Supply and Sanitation Department of the Government of Maharashtra;

e. "Eligibility for promotion" means eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in rules, regulations or orders issued by the General Administration Department of the Government, from time to time;

f. "Government" means the Government of Maharashtra.

g. "Degree" means a degree of any discipline of a statutory university or any other qualification declared by the Government to be equivalent thereto.

h. "Departmental Examination" means the Departmental Examination conducted in accordance with the rules prescribed by the Government from time to time for the Mechanical Cadre in the Groundwater Surveys and Development Agency.

3. Appointment to the post of **Joint Director (Mechanical)**, Group-A *(Gazetted)* shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of the Chief Drilling Engineer, Group-A, and having not less than three years regular and continuous service on the said post.

4. Appointment to the post of **Chief Drilling Engineer, Group-A** *(Gazetted)* shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of the Senior Drilling Engineer, Group-A, and having not less than three years regular and continuous service on the said post.

5. Appointment to the post of **Senior Drilling Engineer, Group-A** *(Gazetted)* shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of the Deputy Engineer (Mechanical), Group-A and having not less than three years regular and continuous service on the said post.

6. Appointment to the post of **Deputy Engineer (Mechanical),** Group-A *(Gazetted),* shall be made either by,-

a) promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons,-
   1. holding the post of the Junior Engineer (Mechanical), Group-C *(Non-Gazetted),* in the Directorate and having not less than ten years regular and continuous service on the said post, including at least five years of regular and continuous service on the upgraded post of Sectional Engineer (Mechanical), Group-B *(Gazetted)*; or
   2. holding the post of the Junior Engineer (Mechanical), Group-C *(Non-Gazetted),* in the Rural Water Supply Department of Zilla Parishads and having not less than ten years regular and continuous service on the said post, including at least five years of regular and continuous service in the upgraded post of Sectional Engineer (Mechanical), Group-B *(Gazetted)* and fulfilling the eligibility criteria for promotion; or

b. nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of result of Competitive Examination conducted therefor, who fulfils the following criteria, namely:-

(i) Age Limit.-

(A) Lower Age Limit.- Not less than eighteen years of age as on the last date of receipt of application as per the advertisement for recruitment to the post.

(B) Upper Age Limit.- Not more than thirty-eight years of age for the persons not belonging to reserved category and not more than forty-three years of age for persons belonging to reserved category as on the last date of receipt of application as per the advertisement for recruitment to the post.

(ii) Minimum Educational Qualification.- Possess a degree in Mechanical Engineering or Automobile Engineering.

7. ***Approval of Appointing Authority.***- Appointment to the posts mentioned in rules 3 to 6 shall be made with the approval of the appointing authority.

8. ***Ratio of appointment.-*** *(a)* Appointment to the post mentioned in rule 6 by promotion and nomination shall be made in the ratio of 50: 50, respectively.

(b) Appointment to the post mentioned in rule 6 by promotion from amongst Sectional Engineer (Mechanical) in the Directorate and Sectional Engineer (Mechanical) in Rural Water Supply Department of Zilla Parishad shall be in the ratio of 20:80, respectively.

9. ***Provision of Departmental Examination.***- *(a)* A person to be appointed by promotion to the post mentioned in Rule 6 are required to pass the departmental examination or get exempted from passing departmental exam prior to promotion. If such person does not pass or get exempted from Departmental Examination within the prescribed period, then such person will not be eligible for promotion to the said post.

(b) A person appointed to the post mentioned in rule 6 by nomination, shall be required to pass the prescribed Departmental Examination for the post, within the prescribed period, unless he has been exempted from passing that examination. If such person does not pass the prescribed Departmental Examination within the prescribed period, then his services shall be liable to be terminated.

10. ***Probation Period.***- A person appointed to the post mentioned in rule 6 by nomination shall be on probation for a period of two years. The probation period may be extended maximum upto one year. Completion of the probation period (including extended period) satisfactorily as per the probation policy of the Government, passing of the prescribed Departmental Examination, if any, and completion of prescribed training, if any, is mandatory. In the event of failing to complete the probation period (including extended period) satisfactorily as per the probation policy of the Government or in the event of failing to pass the prescribed Departmental Examination, if any, during the probation period or in the event of not completing the prescribed training, if any, his services shall be liable to be terminated.

11. ***Marathi and Hindi Languages Examinations.***- *(a)* A person to be appointed to the post mentioned in rules 3, 4, 5 and 6 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has been exempted from passing those examinations, before getting promoted to the said post.

(b) A person appointed to the post mentioned in rule 6 by nomination shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passes those examinations.

12. ***Certificate in Computer Operations.***- *(a)* A person to be appointed to the posts mentioned in rules 3, 4, 5 and 6 by promotion shall possess a Certificate of Computer Operations prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he already possesses such Certificate or has been exempted therefrom, before getting promoted to the said post.

(b) A person appointed to the post mentioned in rule 6 by nomination shall possess a Certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he already

possesses such certificate or has been exempted therefrom, otherwise he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possesses the same.

13. ***Declaration of Small Family***.- *(1)* A person recommended for appointment by nomination to the posts mentioned in rule 6 shall submit a declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(2) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family shall be disqualified for the appointment in Government Service.

(3) After appointment of a person in the Government Service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in Government service.

14. A person appointed to the posts mentioned in rules 3 to 6 shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra, as the seniority list of the said post is maintained at State level.

15. The terms and conditions specified by the Government, in any rules, orders or resolutions issued in this behalf by the Government, from time to time, before or subsequent to the appointment of any Government Servant, shall be applicable to the concerned Government Servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(Parrag Jain-Nainutia)
Additional Chief Secretary to Government.